

सोलापूर महानगरपालिका कामगार
कल्याण जनसंपर्क विभाग
ई – न्यूजलेटर



सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त डॉ बाबासाहेब आंबेडकर चौक, बुधवार पेठ येथील अस्थिविहार ,कौन्सिल हॉल येथील महापौर कार्यालयात प्रतिमेस अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

Volume III | Issue 12 | Date 24-05-2024

## सोलापूर शहर वाढीव पाणीपुरवठा योजना

उजनी धरण उद्भव - १७० द. ल लि क्षमता

सोलापूर शहराच्या पिण्याच्या पाण्यासाठी स्मार्ट सिटी अंतर्गत उजनी धरण जलाशय उद्भव धरून पाणीपुरवठा योजना तयार करण्यात आलेली आहे. सदर योजनेद्वारे सोलापूर शहरात दररोज १७० द.ल.ली पाणी उपलब्ध होणार आहे. सदर योजनेत मुख्यत्वे धरण क्षेत्रात जॅकवेल बांधणे ,पंपिंग मशनरी, अशुद्ध पाण्याची दाबनलिका, बीपीटी, अशुद्ध पाण्याची उतारनलिका असे एकूण ११०km पाईपलाईन, क्रॉसिंग ( रेल्वे, राष्ट्रीय महामार्ग, राज्य महामार्ग, इतर रस्ते ,कॅनॉल, सीना नदी असे एकूण 63 नग इत्यादी कामांचा समावेश आहे. हे काम एक जून २०२३ रोजी ठेकेदार पोचमपाड कन्स्ट्रक्शन कंपनी हैदराबाद यांना देण्यात आले आहे. सदर कामासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून काम पाहत आहे. हा प्रकल्प पूर्ण करण्याचा कालावधीत २१ महिने आहे.

(नोव्हेंबर २०२४अखेर) तदनंतर तीन महिने ट्रायल रन व तीन वर्ष देखभाल दुरुस्ती कालावधी आहे सदर योजनेचा आकृतीबंध - स्मार्ट सिटी हिस्सा रु. २५० कोटी, एनटीपीसी हिस्सा रु. २५० कोटी, महाराष्ट्र शासन नगरोत्थान - ३८२.६८ कोटी योजनेची भौतिक प्रगती -७५ टक्के , आर्थिक प्रगती ७१ टक्के

सध्याच्या कामाची स्थिती जॅकवेल 70 टक्के काम पूर्ण झाले आहे. पाईप पुरवठा आजपर्यंत 110 km पैकी 100 किलोमीटर पाईपचा पुरवठा करण्यात आला आहे. पाईप अंथरणे आजपर्यंत 110 km पैकी 86 km पाईप अंतरली आहे. हायड्रोलिक टेस्टिंग आजपर्यंत एकूण 47 km पाईपलाईनचे हायड्रोलिक टेस्टिंग पूर्ण झाली आहे क्रॉसिंग - ९ राष्ट्रीय महामार्ग, २ राज्य महामार्ग, २१ इतर रस्ते, ७ कॅनाल पार करण्यात आले आहे . सदर कामाचे पाहणी प्रसंगी सार्वजनिक आरोग्य अभियंता व्यंकटेश चौबे,उपाभियंता सिद्धेश्वर उत्सुरगे, उपाभियंता तपन डंके,सह. अभियंता संतोष यलगुलवार, श्री विजय नलावडे, हरीश एम. एस,सतीश एकबोटे, नितीन आंबिगार, श्रीशैल बाबानगरे, अजिक्य विपत, उमर बागवान आदी मान्यवर उपस्थित होते.

